# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/08/2023 (शनिवार) सकाळ

## सराईत गुन्हेगार सोनु उर्फ सुबोध बाबारावजी लांजेवार याला MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द

### (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत येणाऱ्या करंभाड पारशिवनी परीसरात राहणारा सराईत गुन्हेगार सोनु उर्फ सुबोध बाबारावजी लांजेवार, वय ३४ वर्ष, रा. करंभाड पारशिवनी हा मागील ०३ वर्षापासून पारशिवनी परिसरात गुंडगिरी करुन नागरिकांना त्रास देत होता. तो नेहमी गुन्हेगारी कृत्यात गुंतलेला असायचा. पारशिवनी परिसरात मोहाफुलाची हातभट्टीने दारू काढुन विक्री करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असामाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करुन दहशत पसरवित असतो. नागपूर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरुध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवून त्याचेविरुध्द गुन्हे नोंद केले. परंतु सुबोध याचे गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये सुधारणा झाली नाही. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु सुबोध याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरुच ठेवली. सुबोध याचे कृत्य सामाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण कडुन MPDA कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दि. १८/०८/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी सराईत गुन्हेगार सोनु उर्फ सुबोध बाबारावजी लांजेवार याचे विरुध्द स्थानबध्दता आदेश काढला त्यानुसार त्याला मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे १ वर्षाकरीता स्थानबध्द केले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन पारशिवनी येथील पोलीस निरीक्षक राहुल सोनवने, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, सहायक फौजदार सुरज परमार, पोलीस हवालदार निलेश बर्वे, पोलीस अंमलदार होमेश्वर वाईलकर यांनी पार पाडली.

## घरफोडी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील संताजी नगर येथे दिनांक १७/०८/२०२३ चे १८/३० वा. सुमारास फिर्यादी नामे— ग. भा. सुनिता सुरेश यादव, वय ४४ वर्ष रा. संताजी नगर कन्हान हिच्या भावाच्या वाढदिवसा करीता फिर्यादी ही दि. १७/०८/२०२३ चे ११/०० वा. माहेरी गेली असता व फिर्यादीचे दोन्ही मुले हे घराला व गेटला लॉक लावुन ॲक्टीवा गाडीचे सर्वीसिंग करीता साय. ०६/३० वा. कामठी येथे गेले व ०८/३० वा. दरम्यान गाडीची सर्विसिंग करून परत आले तेव्हा गेटला लॉक नव्हता व गेटची कडी लावुन होती आत प्रवेश केला असता घराला सुध्दा लॉक नव्हता व दाराची कडी लागली होती घराच्या आत प्रवेश केला असता हॉल मधिल लोखंडी बॉक्स बेडवरील सामान पसरलेले होते. बेडचा बॉक्स उघडया स्थितीत दिसला. बेडरूम मधील आलमारी उघडी असुन त्यातील सामान अस्ताव्यस्त दिसले. १) तीन तोळे लग्नाचा हार किंमती ७५०००/— रू., २) एक तोळा साधा हार किंमती २५०००/— रू., ३) तिन तोळे मंगळसुत्र किंमती ७५०००/— रू. ४) लहान तिन अंगठी वजन दिड तोळे किंमती १५०००/— रू. ५) एक तोळे जेन्टस अंगठी किंमती २५०००/— रू. ६) ५ ग्रॅम बिंदीया किंमती १२०००/— रू. ७) दोन ग्रॅम नथ किंमती ५०००/— रू. ८) ८ ग्रॅम कानातील झुमके किंमती २००००/— रू. ९) ५ ग्रॅम कानाची बाली किंमती १२५००/— रू १०) ४ ग्रॅम कानाचे वेल किंमती ८०००/— रू. ११) ४ ग्रॅम डोरले किंमती मनी किंमती १००००/— रू. , १२) ५ ग्रॅम गळयाची चैन किंमती १२५००/—रू., एकुण सोन्याचे भांडे २,९५०००/— रू. तसेच १३) डीव्हीआर किंमती ३०००/— रू. १४) आठ तोळे चांदीची पायजेप किंमती ३००००/— रू असे एकुण ३,२८०००/— रू. व नगदी ३००००/— रू. असा एकुण ३,५८,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सार्थक नेहते मो. नं. ९४२२६६६७७५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**